Career Counselling Training Program DEPARTMENT OF MANAGEMENT SCIENCE OSMANABAD

Date 1/4/2022

# करिअर मॅनेजमेंटवर कार्यशाळेचे आयोजन

**उस्मानाबाद** । व्यवस्थापनशास्त्र विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, उप-परिसर उस्मानाबाद येथे दि. १ एप्रिल २०२२ रोजी ऑनलाइन 'करिअर मॅनेजमेंट'वर कार्यशाळा आयोजित केली गेली. याचे उदघाटन, विद्यापीठ उपपरिसराचे संचालक डॉ. डी. के. गायकवाड यांनी केले. उद्घाटनप्रसंगी बोलताना डॉ. गायकवाड यांनी खासगी क्षेत्रातील वाढत असणारी नोकरीबाबत अपेक्षा व वाढणाऱ्या संधी याबाबत माहिती दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व्यवस्थापन शास्त्र विभागाचे संचालक डॉ. सुयोग अमृतराव यांनी केले. कार्यशाळेस दोन तांत्रिक सत्र ठेवण्यात आले होते. पहिल्या सत्रात डॉ. विक्रम शिंदे यांनी तर द्वितीय सत्रात प्रा. सचिन बस्सैये यांनी २०२२ वर्षी तंत्रशिक्षनालय यांच्या मार्फत होणाऱ्या एम. बी. ए. व एम. सी. ए. प्रवेश नोंदणी प्रक्रिया, कागदपत्र, तारखा, प्रवेशपरीक्षेची तयारी या विषयी मार्गदर्शन केले. २६३ सहभागी विद्यार्थ्यांनी नोंद केली होती. ही कार्यशाळा कुलगुरू प्रा. डॉ. प्रमोद येवले, प्रकुलगुरू प्रा. डॉ. श्याम शिरसाठ, कुलसचिव प्रा. डॉ. जयश्री सूर्यवंशी, अधिष्टाता प्रा. डॉ. वाल्मिक सरवदे, प्रा. डॉ. अभिजित शेळके, डॉ. फारूक खान, उप-कुलसचिव डॉ. दिगंबर नेटके यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आली.

# विद्यापीठ उपकेंद्रातील करिअर मॅनेजमेंट कार्यशाळेस प्रतिसाद

**पुण्य नगरी** । वृत्तसेवा

**उस्मानाबाद:** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या उस्मानाबाद येथील उपकेंद्रात शुक्रवारी (दि.१) विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन करिअर मॅनेजमेंट कार्यशाळा घेण्यात आली.

विद्यापीठ उपकेंद्राचे संचालक डॉ. डी. के. गायकवाड यांच्या उपस्थितीत कार्यशाळेचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी बोलताना संचालक डॉ. गायकवाड म्हणाले, खाजगी क्षेत्रात विद्यार्थी कसा यशस्वी होईल व त्यासाठी काय करणे योग्य आहे ते करण्यासाठी नेहमी विविध उपक्रम विभागा मार्फत राबवण्यात येत आहेत. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व्यवस्थापन शास्त्र विभागाचे संचालक डॉ. सुयोग अमृतराव यांनी केले. पहिल्या सत्रात डॉ. विक्रम शिंदे यांनी व्यवस्थापनात उपलब्ध संधी व त्यासाठी करावी लागणारी तयारी याबाबत माहिती दिली. द्वितीय सत्रात प्रा. सचिन बस्सैये यांनी २०२२ वर्षी तंत्रशिक्षनालय यांच्या मार्फत होणाऱ्या एम.बी. ए. व एम. सी. ए. प्रवेश नोंदणी प्रक्रिया, कागदपत्र, तारखा, प्रवेशपरीक्षेची तयारी या विषयी मार्गदर्शन केले. कार्यशाळेत २६३ विद्यार्थी सहभागी झाले होते. कार्यशाळेचे सुत्रसंचालन प्रा. सुप्रिया सुकाळे तर आभार प्रा. धनश्री कोळपे यांनी मानले.